-: प्रेसनोट दिनांक - २५/०६/२०२६ :-

आरोपी लोकसेवक अपर्णा सुखदेव जाधव, पद - पोलीस उप निरीक्षक, शाहुपूरी पोलीस ठाणे, मुळ रा. हातनोळी, ता. तासगाव, जि.सांगली सद्या रा कळंबा कोल्हापूर यांनी लाच मागणी केलेबाबत.

---

यातील मुळ तकारदार यांचे विरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक जाधव मॅडम यांच्याकडे आहे. या तपासात तकारदार हे अटकेमध्ये असताना त्यांना तपासात व जामीनासाठी मदत करतो म्हणुन जाधव मॅडम यांनी त्यांच्याकडे लाच मागणी केली होती. त्यावेळी तकारदार यांनी त्यांचे वडीलांचेकरवी जाधव मॅडम यांना २५,०००/- रूपये दिले होते. तकारदार हे जामीनावर बाहेर आलेनंतर त्यांच्याकडे जाधव मॅडम या राहीलेले लाच रक्कमेची मागणी करणार आहेत याबाबतची तकार तकारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तकार दिलेली होती.

दिलेल्या तकारीप्रमाणे लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता त्यामध्ये यातील मुळ तकारदार यांचेवर शाहुपूरी पोलीस ठाणे येथे दाखल असले गुन्हयात तसेच जामीनासाठी मदत केली म्हणुन त्यांचे वडीलांचेकडुन तकारीपुर्वी पोलीस उप निरीक्षक जाधव मॅडम यांनी २५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारल्याचे मान्य करून, तकारदार यांच्याकडे त्यांनी स्वता:करीता बेकायदेशीरपणे आणखीन २५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरबाबत आरोपी अपर्णा सुखदेव जाधव, पद - पोलीस उप निरीक्षक, शाहुपूरी पोलीस ठाणे, मुळ रा. हातनोळी, ता. तासगाव, जि.सांगली सद्या रा. कळंबा कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे,यांचे मार्गदर्शनानुसार वैष्णवी पाटीलपोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उज्वला भडकमकर, प्रकाश भंडारे, सहायक पोलीस उप निरीक्षक, संदिप काशीद, पो.हे.कॉ., संगिता गावडे, पो.हे.कॉ.सचिन पाटील, पो.ना. संदिप पवार पो.कॉ. यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील अमंलदार यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :-
०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९४०४३२१०६४, ९७६४१४०७७७.

४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

५) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४

६) व्हॉटस अप कमांक :- .९४०४३२१०६४.